सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/सकअमविप/२०२३/२४ दिनांक :- २२ मार्च, २०२४

# -: प्रसिध्दीपत्रक :-

## सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२३
## अंतिम निकाल
## जाहिरात क्रमांक - ३२/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२३ या परीक्षेच्या मंत्रालयीन विभागातील एकूण ६० पदांचा अंतिम निकाल दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेमध्ये **श्री. बरडे निलेश सज्जन (बैठक क्रमांक - MB001331)** हे प्रथम आले आहेत.

**३.** उमेदवारांच्या माहितीसाठी अंतिम शिफारस यादी, सीमांकन गुण व अंतिम गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**४.** प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, जाहिरातीमधील तरतूदींनुसार दावे तपासताना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १४९६४/२०२३ व १४९६६/२०२३ तसेच मा. न्यायालय / न्यायाधिकरणात दाखल अन्य न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयांच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग